श्री. अशोक मनोहर शिंदे, तत्कालीन सहायक लेखाधिकारी, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, अहिल्यानगर यांना निलंबनातून मुक्त करुन शासन सेवेत पुन:स्थापित करण्याबाबत.....

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
22 JAN 2026
प्राप्त झाले सही.........

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र. ९७/कोषाप्रशा-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ जानेवारी, २०२६

संदर्भ : संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र. संलेको-०३-२०२५/प्रशा-राप-सलेअ/वले-१/टी-४१०/श्री. शिंदे/निलंबन/२०६/०१५४/पार क्र. २०२५/५५, दिनांक १८.०३.२०२५

## शासन आदेश

श्री. अशोक मनोहर शिंदे, तत्कालीन सहायक लेखाधिकारी, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, अहिल्यानगर यांना संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्या संदर्भाधीन दिनांक १८.०३.२०२५ च्या आदेशान्वये दिनांक १९.०२.२०२५ पासून निलंबित करण्यात आले आहे.

135

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.निप्रआ-११२२/प्र.क.०९/विचौ-२, दिनांक २२.०४.२०२५ मधील तरतुदीनुसार श्री. अशोक मनोहर शिंदे (निलंबित), तत्कालीन सहायक लेखाधिकारी, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, अहिल्यानगर यांना मा. न्यायालयीन निर्णयाच्या व विभागीय चौकशीच्या निर्णयाच्या अधीन राहून निलंबनातून मुक्त करुन शासन सेवेत पुन:स्थापित करण्यात येत आहे. श्री. अशोक मनोहर शिंदे यांना शासन सेवेत पुन:स्थापित केल्यानंतर त्यांची पुढीलप्रमाणे पदस्थापना करण्यात येत आहे.

23/1/26

00100/2026/146
23.1.2026

| अ.क्र. | निलंबीत अधिकारी यांचे नाव, पदनाम व कार्यालय | मूळ महसूली विभाग | निलंबनापूर्वी कार्यरत असतांनाचा महसूली विभाग | प्रस्तावित पुन:स्थापना / पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. अशोक मनोहर शिंदे, तत्कालीन सहायक लेखाधिकारी, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, अहिल्यानगर | नाशिक | नाशिक | प्रबंधक, ग्राहक तक्रार निवारण मंच, गडचिरोली<br>महसूली विभाग - नागपूर |

३ श्री. अशोक मनोहर शिंदे, तत्कालीन सहायक लेखाधिकारी, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, अहिल्यानगर यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी त्वरीत रुजू होऊन त्याबाबतचा रुजू अहवाल शासनास सादर करावा, अन्यथा त्यांची ही अनधिकृत गैरहजेरी म्हणून समजण्यात येईल, तसेच त्यांच्या निलंबन कालावधीबाबतचा निर्णय हा मा. न्यायालयीन निर्णय व विभागीय चौकशीचा निर्णय यावर अवलंबून राहील. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(माणिक ढमाले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री. अशोक मनोहर शिंदे, तत्कालीन सहायक लेखाधिकारी, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, अहिल्यानगर (संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत)

प्रत-

(१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, १ व २ (मुंबई/नागपूर.)

(२) महालेखापाल (लेखा परीक्षा ) महाराष्ट्र, १ व २ (मुंबई/नागपूर. )

(३) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

(४) अपर मुख्य सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

(५) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई

(६) सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर*

(७) सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक *

(८) कक्ष अधिकारी (कोषा-प्रशा-२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

(९) निवडनस्ती (कोषा-प्रशा-१)

(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत)